# IWMP-Cluster no. 12, TE-14, 2010-2011

## राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था, अमळनेर,

## शाखा- जामनेर, जि. जळगांव

## शिर्षक :- मुक्याची तहान

### गावः - पिंपळगाव गोलाईत, ता. जामनेर

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम पिंपळगाव गोलाईत येथे 2010-11 मध्ये प्रकल्प नं.12 चे काम सुरु झाले. प्रथम गावात ग्रामसभा घेवून गावाच्या अडीअडचणी जाणून घेण्यात आल्या. व PRA च्या माध्यमातुन संपुर्ण माहिती जाणून घेण्यात आली. गोठा करीत असतांना असे दिसुन आले की, गावात जनावरांची संस्था भरपुर असुन त्यांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था नाही.

गावात ज्या दिशेने पडीत जमीन आहे. त्या भागाला 90% गुरे चरण्यासाठी जातात. पण पिण्याच्या पाण्याची सोय नाही. त्यामुळे या गावातील जनावरे तहानेने व्याकुळ होतात. या गावातील पाण्याचा विचार केला तर येथील माणसांना उन्हाळयात विकत पाणी घ्यावे लागते. तर मग या मुक्या प्राण्यांचे काय? या सर्व गोष्टींचा विचार करीत असता ज्या दिशेने जास्त प्रमाणात गुरे चरण्यासाठी जातात त्या दिशेनो एक अहाळ बांधायचा असे सर्व गामस्थांच्य मते ठरविण्यात आले. आणि यासाठी राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्थेने देखील पुढाकार घेतला. व EPA अंतर्गत हे काम करण्याचे ठरविले.

अशापध्दतीने मग गुरांसाठी अहाळ बांधण्याचे काम सुरु झाले. व हे अहाळचे काम बघुन गावक-यांना सुद्धा मोठया प्रमाणात आनंद वाटू लागला. कारण शेतक-यांना आपल्या गुरांना पाणी पाजण्यासाठी वनो-वनी भटकावे लागत होते. काही दिवसातच अहाळचे काम पुर्ण करण्यात आले. व एका शेतक-याच्या विहिरीवरुन पाईपलाईन करुन पाणी अहाळमध्ये टाकण्यात आले.



आज सर्व गावातील मुक्या प्राण्याची तहान भागु लागली असुन शेतक-याच्या सुध्दा वेळ वाचला. माणुस बोलु शकतो, पण मुक्याला कितीही तहान लागली तर तो हंबरडा फोडतो पण ते आपणास समजत नाही. आज जर तहान लागली तर पाणी येथे आहे. हे समजल्यावर बरोबर गुरे त्या ठिकाणावर जावून पाणी पिवू लागले आहेत.



अशाप्रकारे पिंपळगाव गोलाईत या गावात गुरांसाठी आहाळ बांधल्याने मुक्याची तहान भागु लागली.

**सुनंदा पी. विसावे**
**(उपजिवीका तज्ञ)**
**राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था, अमळनेर**
**शाखा-जामनेर, जि. जळगाव**